# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

सत्यमेव जयते

सारथी

बालचित्रवाणी, गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे, पुणे (महाराष्ट्र) – ४११००४, दूरध्वनी क्र. ०२०-२५५९२५०१ / ०८

Email ID : csmnrf2020@gmail.com | CIN- U74999PN2018NPL177394 | Website : https://sarthi-maharashtragov.in


दिनांक:- १५/०१/२०२१

# छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF – 2020)

# त्रुटी पूर्ततेकरिता कागदपत्रे सादर करण्यास मुदतवाढ

छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF – 2020) यासाठी दिनांक १३ सप्टेंबर, १५ सप्टेंबर, १७ सप्टेंबर, १८ सप्टेंबर, १९ सप्टेंबर, २०१९ रोजी विविध वर्तमानपत्रात सारथी द्वारे प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात व सारथी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचना व मार्गदर्शक तत्वानुसार (Guidelines) ऑनलाईन अर्ज मागविण्याची प्रक्रिया दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी पूर्ण झाली असून सारथी कार्यालयास उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

प्राप्त अर्जांची छाननी केली असता खालीलप्रमाणे ३ याद्या प्रसिद्ध करण्यात येत आहेत:-

**सारथी CSMNRF - २०२० M.Phil. व Ph.D. अधिछात्रवृत्ती करीता प्राप्त अर्ज गोषवारा**

| अ.क्र. | विवरण | संख्या |
|---|---|---|
| 1 | प्राप्त कागदपत्राच्या अधारावर पात्र अर्ज | 177 |
| 2 | कागदपत्र उपलब्ध होण्याच्या अधिन राहून पात्र अर्ज | 117 |
| 3 | रद्द करण्यात आलेले अर्ज | 48 |
| | **एकूण प्राप्त अर्ज** | 342 |

अनेक उमेदवारांनी अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे जोडली नसल्याने किंवा कागदपत्रात त्रुटी असल्याने असे अर्ज त्रुटी पूर्ततेकरिता वगळण्यात आले आहेत. कागदपत्र उपलब्ध होण्याच्या अधिन राहून सदर उमेदवारांचे अर्ज निवड प्रक्रीयेमध्ये समाविष्ट करण्याकरिता एक संधी म्हणून यादीमध्ये नावासमोरील नमूद कागदपत्रे **दिनांक**

**२० जानेवारी, २०२१ रोजी सायंकाळी ०५ वाजेपर्यंत** सारथी कार्यालयामध्ये समक्ष / स्पीड पोस्ट / रजिस्ट्रड पोस्ट / कुरियर द्वारा सादर करावीत.

सदर कागदपत्रे सारथी कार्यालयास मुदतीमध्ये सादर करण्याची जबाबदारी सर्वस्वी अर्जदारांची राहील. **दिनांक २० जानेवारी, २०२१** नंतर आलेल्या कागदपत्रांचा स्वीकार कोणत्याही परिस्थितीमध्ये केला जाणार नाही. पोस्टल / कुरियर उशिरा पोहचल्यास 'सारथी' संस्था जबाबदार राहणार नाही. कागदपत्रे सारथी कार्यालयात वेळेत पोहच न झाल्यास सदर अर्ज निवड प्रक्रीयेमधून कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल.

**सारथी कार्यालय पत्ता :-** व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण, आणि मानव विकास संस्था (सारथी), बालचित्रवाणी, सी. टी सर्वे नं. 173, गोपाल गणेश आगरकर रोड, पुणे – 411 004

मा. व्यवस्थापकीय संचालक, सारथी यांच्या मान्यतेने.

**गीता नागर**
**लेखापाल तथा प्र. निबंधक,**
**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे.**